# आयसीडब्ल्यूए परीक्षेतील गुणवंतांचा सत्कार

औरंगाबाद, दि.७ (लोकमत ब्युरो)- औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाऊंटन्स संस्थेच्या आय.सी.डब्ल्यू.ए. परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोमवारी करण्यात आला.

सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी स.भु. महाविद्यालयाचे प्राचार्य बी.वाय. क्षीरसागर तर प्रमुख पाहुणे म्हणून निर्लेप उद्योग समूहाचे व्यवस्थापकीय संचालक मुकुंद भोगले उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष आर.पी. गोरे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय एस.आर. पिंपळे यांनी करून दिला, तर एम.आर. पंडित, एन.आर. शर्मा यांनी स्वागत केले. यावेळी आय.सी.डब्ल्यू.ए.च्या जून-२००५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेतील ५३ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास ए.आर. जोशी, एस.के. जैन, आर.जी. मोदाणी, उपप्राचार्य जे.एस. खैरनार, एन.बी. आघाव, ए.बी. देशपांडे, आर.बी. शुक्ला यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन एस.व्ही. जोशी यांनी केले, तर आर.बी. मुळी यांनी आभार मानले.


**सुचना**

गुरुदर्शन यात्रा निमित्त दुकान 11 सितंबर से 18 सितंबर तक बंद रहेगी.

**जे. पी. सुराणा**

गुलमंडी, औरंगाबाद ☎ 2324807


दैनिक लोकमत

8/9/05

# 'आयसीडब्ल्यूए चॅप्टर'तर्फे विद्यार्थ्यांचा सत्कार

**औरंगाबाद, ता. ७ :** दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाउंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीडब्ल्यूए) जून २००५ मध्ये घेण्यात आलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार चॅप्टरच्या औरंगाबाद शाखेतर्फे सोमवारी (ता. पाच) हॉटेल अतिथी येथे करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून निर्लेप उद्योगसमूहाचे व्यवस्थापकीय संचालक मुकुंद भोगले तर अध्यक्षस्थानी सरस्वती भुवन कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. वाय. क्षीरसागर होते. या वेळी सरस्वती भुवन कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य जे. एस. खैरनार, एन. बी. आघाव, ए. बी. देशपांडे, एस. बी. कुलकर्णी उपस्थित होते.

चॅप्टरचे अध्यक्ष आर. पी. गोरे यांनी, 'चॅप्टर'मार्फत विद्यार्थी आणि उद्योग जगतासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली.

प्रमुख पाहुणे मुकुंद भोगले यांनी चांगल्या कॉस्ट अकाउंटंट्सची आवश्यकता असल्याचे सांगितले. डॉ. बी. वाय. क्षीरसागर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांतर्फे मनोज मालपाणी, अस्मिता पालकर, सुनील मणियार, मुक्ता देशपांडे तसेच पालकांनी मनोगत व्यक्त केले. 'चॅप्टर'चे सचिव एस. व्ही. जोशी यांनी सूत्रसंचालन केले तर आर. बी. शुक्ला यांनी आभार मानले.




औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाउंट्सतर्फे आयसीडब्ल्यूए जून २००५ परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी इंटरमिजिएट आणि फायनल परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांसह प्रमुख पाहुणे उद्योगपती मुकुंद भोगले, डॉ. बी. वाय. क्षीरसागर, चॅप्टरचे अध्यक्ष आर. पी. गोरे आणि कार्यकारिणी सदस्य.

दैनिक सकाळ

8/9/05

# उत्पादन शुल्क कर्मचाऱ्यांसाठी 'कॉस्ट अकौंटिंग' कार्यशाळा

**औरंगाबाद**, ता. २२ : औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकौंट्सतर्फे केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी नुकतीच 'कॉस्ट अकौंटिंग स्टॅंडर्डस्' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

प्रमुख पाहुणे म्हणून औरंगाबाद विभागाचे सहायक आयुक्त सपकाळ, तर उपायुक्त श्री. मानसिंग अध्यक्षस्थानी होते. चॅप्टरचे अध्यक्ष आर. पी. गोरे यांनी चॅप्टरमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली, तर एम. आर. पंडित यांनी कार्यशाळेमागील संकल्पना स्पष्ट केली. श्री. सपकाळ आणि श्री. मानसिंग यांनी मनोगत व्यक्त केले. ए. आर. जोशी, एस. आर. पिंपळे, एस. बी. खडके आणि एम. आर. पंडित यांनी मार्गदर्शन केले. एस. आर. पिंपळे यांनी स्वागत व सूत्रसंचालन केले.



'चॅप्टर ऑफ कॉस्ट अकौंट्स औरंगाबाद'तर्फे केंद्रीय उत्पादन शुल्क कार्यालयात आयोजित कार्यशाळेला उपस्थित आर. पी. गोरे, श्री. मानसिंह, श्री. सपकाळ, एम. आर. पंडित, एस. आर. पिंपळे.

दैनिक सकाळ

दि. 23/9/05